MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४१/२००९/ दिनांक :

श्री. रोहिदास अंबाजी सोदागर,
मु.पो. जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरुध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**कोरम** :-१) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. के.वाय.जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे — दिनांक : १५.०७.२००९

सदरील प्रकरण हे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडील तक्रार क्र.८७० बाबत दिनांक २२.५.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द दाखल झाली आहे. तक्रारदाराचे मूळ अर्जाप्रमाणे अर्जदराने ३ अश्वशक्ती शेती वीज पंपासाठी विजेची जोडणी मागण्या बाबतचा अर्ज दि. ६.३.२००९ रोजी दिला होता व त्या बाबत अर्जाची जरुर ती प्रोसेसिंग फी रु.२५/- मनिऑर्डरने वि.प.कडे पाठविली होती.

वि.प.स प्रोसेसिंग फी दि ९.३.२००९ रोजी मिळाली. अर्जदाराने तदनंतर मुदतीत चलन दिले नाही व परिणामी, कृती मानकेमध्ये दिलेल्या तरतुदींचा भंग झाला आहे. सबब त्यांनी नियमाप्रमाणे नुकसान भरपाईची मागणी केली.

वरील अर्जाबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने नियमाप्रमाणे विलंब झाला असल्यास भरपाई द्यावी असा आदेश केला. परंतु निश्चित अशी रक्कम निर्देशित केली नाही. सबब या प्रकरणी अपील दाखल करण्यात आले.

सदरच्या अपिलाबाबत वि.प.स नोटीस देवून म्हणणे मागविले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, दि. ९.३.२००९ रोजी प्रोसेसिंग फी जमा झाल्यानंतर दि. ५.५.२००९ रोजी अर्जदारास कोटेशन देण्यात आले. सदर प्रकरणामध्ये वीज जोडणीसाठी ०.२४ कि.मी. अशी एल.टी. लाईनचे जाळे व ४ पोल उभे करण्याचे काम आवश्यक आहे. नियमाप्रमाणे अशा बाबत कोटेशन देण्यासाठी ३० दिवसांचा मुदत दिलेली आहे. सबब त्यांचे म्हणणे की, चलन देण्यासाठी २६ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्याबाबत नियमाप्रमाणे नुकसान भरपाई मिळण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

या प्रकरणी अर्जदार सुनावणीच्यावेळी गैरहजर होते तसेच त्यांचे प्रतिनिधीही गैरहजर होते. वि.प.तर्फे सहाय्यक अभियंता श्री. दिवटे, संख उप विभाग हजर झाले व त्यांनी त्यांची बाजू मांडली.

दोन्ही बाजूंच्या कथनाचा विचार करता, सदर प्रकरणी कृती मानकेमध्ये दिलेल्या नियमाप्रमाणे अर्जदारास कोटेशन दि. ९.४.२००९ पर्यंत देणे आवश्यक होते, मात्र दि. ५.५.२००९ रोजी दिल्याने एकूण ४ आठवड्यांचा विलंब झालेला आहे. अशा ४ आठवड्यांच्या विलंबासाठी कृती मानकेमध्ये दिलेल्या तरतुदीप्रमाणे रु. ४००/- इतकी भरपाई अर्जदारास देण्यास वि.प.स आदेश करणे आवश्यक ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) अपील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार यांना कोटेशन देण्यास ४ आठवड्यांचा विलंब झाल्याने वि.प.ने रु. ४००/-इतकी अर्जदार यांना भरपाई देण्यात यावी.

३) या अर्जाचे खर्चाबाबत आदेश नाही.

४)

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : १५.०७.२००८

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..